**आक्टोबर २००२**

# सहकारी चळवळीच्या प्रगतीचे सिंहावलोकन

गेल्या ५२ वर्षात संख्यात्मक व वैविध्याच्या निकषावर भारताच्या सहकारी चळवळीने प्रचंड/लक्षणीय प्रगती केली आहे. भारताच्या एकुण ग्रामिण कुटूंबापैकी ६७ टक्के कुटूंबे सहकारी चळवळीत समाविष्ट झालेली आहेत. सहकारी चळवळीत पतसंस्था, जलसिंचन, विपणन, ग्राहक संस्था, वाहतूक संस्था, श्रमिक (मजूर)संस्था, वीज निर्मिती, गृहनिर्माण संस्था, दुध संस्था, शेतमाल प्रक्रिया संस्था इत्यादी प्रकारचे वैविध्य आहे.

संसदेच्या १९९१ - ९२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापासून नवे आर्थिक धोरण अंमलात आणण्याची कार्यवाही सुरु झाली. वाढत्या प्रमाणात खुला / मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार, जागतीकीकरण, रुपयाचे अवमूल्यन, त्याची वाढती परिवर्तनीयता, आयात कर, उत्पादन शुल्क, आयकर, निगम कर या करांच्या दरात वाढती लक्षणीय घट, सार्वजनिक क्षेत्राचा प्रस्तावित क्रमश: संकोच, स्पर्धात्मक बाजार व्यवस्थेला व औद्योगिक व्यवस्थेला दिलेले वाढते महत्व, ही नव्या आर्थिक धोरणाची कमी अधिक प्रमाणात उघड झालेली प्रमुख लक्षणे आहेत. स्पर्धात्मक बाजार यंत्रणाच महत्वाचे आर्थिक प्रश्न सोडवू शकते हा नव्या आर्थिक धोरणाचा पायाभूत विचार जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यांच्या सातत्यपूर्ण प्रचाराचा / प्रयत्नांचा परिपाक होता.

या सर्व धोरणात्मक बदलाचा काळजीपूर्वक आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की, या सर्व बदलात सहकारी चळवळीकडे हेतूपूर्वक किंवा अजाणता परंतू मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले आहे. या पूर्वीच्या आठही पंचवार्षिक योजनांमध्ये सहकारी क्षेत्रांची स्वतंत्र दक्षता घेतली गेली. त्यांच्यासाठी काही कार्यक्षेत्र देण्यात आले. त्यासाठी काही सवलती व अर्थपुरवठा करण्याची जबाबदारी सरकारने स्विकारलेली होती. एवढेच नव्हे तर सहकारी चळवळ हे रोजगार निर्मिती, विषमता निर्मूलन, किंमत पातळीचे नियंत्रण आणि ग्रामीण कृषी औद्योगिक विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे, असा ठाम विश्वास त्यातून व्यक्त होत होता.

सर्व सहकारी संस्थांना पुर्णत: व्यावसायिक, प्रशिक्षीत व्यवस्थापकांमार्फत, आधुनिक व्यवस्थापन व तंत्र विज्ञान स्विकारुन खाजगी संस्थांच्या स्पर्धेला समर्थपणे तोंड देण्यासाठी सक्षम करावे लागेल. सहकारी चळवळीत काम करणाऱ्या जबाबदार व प्रामाणिक कार्यकर्त्यांनी सहकारी संघटना हे स्पर्धात्मक बाजार व्यवस्थेत सामान्य, दुर्बल व्यक्तीचे आर्थिक संरक्षण कवच आहे हे सूत्र लक्षात घेवून स्पर्धात्मक बाजाराला, भांडवलशाही यंत्रणेला कार्यक्षमतेने गुणवत्तेच्या निकषावर सामोरे नेण्याची नैतिक जबाबदारी पत्करणे ही बदलत्या काळाची गरज बनते. तसे झालेच तरच नविन आर्थिक धोरणाचा, सहकारी संस्थांना व दुर्बल घटकांचा एकाचवेळी फायदा होईल. अन्यथा नवीन आर्थिक धोरणाच्या प्रवाही ओघात सहकारी संस्कृती नष्ट होण्याची मोठी भिती आहे. तसेच सहकारी संस्थांचे नियंत्रण व व्यवस्थापन पुर्णत: सदस्यांमार्फत व लोकशाही मार्गाने, स्वतंत्र व स्वायत्त असले पाहीजे.

सर्व आर्थिक धोरण / निर्णयाच्या बाबतीत सहकारी संस्थेच्या सदस्यांचा विचार / शब्द प्रमाण असेल. त्यात राजकीय हस्तक्षेप कोणत्याही स्वरुपात टाळणे आवश्यक आहे. शासकीय मदत, मार्गदर्शन, धोरण, निर्णय स्वातंत्र्याची

गळचेपी करणारे असू नये. अशा परिस्थितीत शासकीय मदत, मार्गदर्शन मिळाले नाही तरी, ते घेऊनच सहकारी कार्यकर्त्यांनी पूढची वाटचाल करणे आवश्यक आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**